जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४०६ दिनांक - ०३/०६/२०२३**

## विमानतळ पोलिस स्टेशन पुणे शहर

## मायकार ॲप वरील मोबाईल नंबर वर संपर्क करुन इनोव्हा क्रिस्टा गाडी भाड्याने घेवुन गाडीसह पसार झालेल्या आरोपींना पोलीसांनी केले जेरबंद

इसम नामे निलेश निंबाळकर,टुरीस्ट व्यावसायिक यांनी दिनांक १२/०५/२०२३ रोजी इनोव्हा क्रिस्टा गाडी इसम नामे रोहीत संदिप दरेकर यास ०९ दिवसा करीता भाड्याने दिली होती. सदरची गाडी भाड्याने घेण्याकरीता रोहीत संदिप दरेकर याने चाकण येथुन चोरी केलेल्या इको गाडी मधील आधारकार्ड,पॅनकार्ड,चेक बुकचा वापर केला होता.सदरची इनोव्हा गाडी घेवुन आरोपी फरारी झाले होते.सदर बाबत विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गु.र.नं. २६३/२०२३ भादंविक ४०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर बाबत तपास पथकाचे प्रभारी अधिकारी विजय चंदन सहा.पोलीस निरीक्षक विमानतळ पो.स्टे.पुणे शहर यांनी आरोपींचे मोबाईल नंबरचे सीडीआर प्राप्त करुन तांत्रिक विश्लेषण करुन यातील आरोपी नामे रोहित संदिप दरेकर यास शिरुर येथुन ताब्यात घेतले होते.नमुद आरोपीकडे पोलीस कस्टडी मध्ये तपास करता,सदरचा गुन्हा हा त्याचे साथीदार आकाश रावासाहेब पोटघन ऊर्फ भडंगे,गणेश रामलाल माळी व सौरभ विक्रम हावळे यांचे मदतीने केला असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झालेले आहे. रोहित दरेकर याचे नमुद साथीदार यांना शिक्रापुर व नाशिक परिसरातुन ताब्यात घेण्यात आले.गुन्ह्यातील इनोव्हा गाडी आरोपी नामे सौरभ विक्रम हावळे याचे मार्फतीने विक्री करणे कामी मृणाल प्रकाश सोरदे, राकेश देवेंद्र पवार रा.नागपुर यांचेकडे नागपुर येथे पाठविलेली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विलास सोंडे यांचे मार्गदर्शनाप्रमाणे तपास पथकाचे प्रभारी अधिकारी विजय चंदन यांनी तपास पथकातील स्टाफसह नागपुर येथे जावुन आरोपी नामे मृणाल प्रकाश सोरदे,राकेश देवेंद्र पवार यांना गुन्ह्यातील इनोव्हा क्रिस्टा गाडीसह ताब्यात घेतलेले आहे.यातील आरोपी नामे रोहीत संदिप दरेकर व आकाश रावासाहेब पोटघन ऊर्फ भडंगे यांचेवर चाकण पोलीस स्टेशन गु.र.नं.१६४७/२०२२ भादंविक ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.तसेच आरोपी नामे आकाश रावासाहेब पोटघन ऊर्फ भडंगे हा अकलुज पोलीस स्टेशन गु.र.नं. ४८८/२०२२ भादंविक ४२०,४०६ या गुन्ह्यामध्ये फरारी असल्याचे निष्पन्न झालेले आहे.दाखल गुन्ह्याचा पुढील तपास सपोफौ अविनाश शेवाळे करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर,श्री.रंजन कुमार शर्मा मा.पोलीस उपायुक्त परि ०४ पुणे शहर,श्री.शशिकांत बोराटे, मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग पुणे शहर,श्री.किशोर जाधव यांचे आदेशान्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर श्री. विलास सोंडे व म.पोलीस निरीक्षक (गुन्हे) विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर संगीता माळी यांचे मार्गदर्शना खाली सहा.पोलीस निरीक्षक,विजय चंदन पोलीस उप निरीक्षक रविंद ढावरे,पोलीस अमंलदार अविनाश शेवाळे,अंकुश जोगदंडे,गिरीश नाणेकर,दादासाहेब बर्डे,रुपेश पिसाळ,नाना कर्चे,सचिन जाधव, सचिन कदम,योगेश थोपटे,ज्ञानेश्वर आवारी यांचे पथकाने केली आहे.